# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट क्रमांक :- १०८-२३** **दिनांक :- ०५/०४/२०२३**

## विवाहबाहय संबंधातुन पतीचा खुन करणारी आरोपीत पत्नी व तिचा प्रियकरास अटक वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ३१/०३/२०२३ रोजी सकाळी ०८:०० वा.चे पुर्वी वालीव गाव, वाघराळपाडा येथील खदानीत ईसम नामे सुनीलकुमार मुन्नीलाल दुबे, वय ३२ वर्ष, रा. वाघराळपाडा वसई (पुर्व) याचे प्रेत मिळुन आले. प्रथमदर्शी मयत सुनीलकुमार दुबे हा दारुचे नशेत खदानीचे पहाडीवरुन पाय घसरुन खाली पडुन मयत झाला असावा असे गृहीत धरुन वालीव पोलीस ठाणेत अकस्मात मृत्यु रजि नं. ५०/२०२३ फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १७४ अन्वये रजिस्टरी दाखल करुन चौकशी सुरु करण्यात आली. सदरच्या अकस्मात मृत्युचे चौकशी दरम्यान मयताचे प्रेतावर ैदयकीय अधिकारी, जे. जे. रुग्णालय, मुंबई येथे शवविच्छेदन केल्यानंतर वैदयकिय अधिकारी जे. जे. रुग्णालय यांनी मयताच्या मृत्युचे कारण ***DEATH DUE TO STRANGULATION WITH HEAD INJURIES (UN-NATURAL)*** असा स्पष्ट अभिप्राय दिल्याने पो.उप.नि. अतुल नावले यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ३५६/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य व संवेदनशीलता लक्षात घेऊन वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे वालीव पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक माहिती व मयत इसम राहणाऱ्या परिसरातील साक्षीदार यांच्याकरवी प्राप्त माहितीच्या आधारे मयत याची पत्नी मुन्नादेवी दुबे व तिचा प्रियकर संजयकुमार प्रसाद यांच्याकडे कौशल्यपुर्ण केलेल्या तपासात मयत सुनिल दुबे हा त्याची पत्नी मुन्नीदेवी दुबे व संजयकुमार प्रसाद यांचे अनैतिक संबंधात अडथळा आणत असल्याने अरोपीत १) मुन्नीदेवी सुनीलकुमार दुबे, वय २४ वर्ष, २) संजयकुमार चंदेश्वर प्रसाद वय- २४ वर्ष दोन्ही रा. वाघराळपाडा वसई पुर्व यांनी आपसात संगनमत करुन मयत यास दारु पाजली व वाघराळपाडयाच्या खदानीचे पहाडीवरुन खाली ढकलुन दिले. तरीही सुनिलकुमार दुबे यास मरण न आल्याने संजयकुमार दुबे याने नायलॉनचे दोरीने गळा आवळुन खुन केल्याचे निष्पन्न झाल्याने वर नमुद आरोपीतांस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हाचा पुढील तपास पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्रीमती पोर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त नालासोपारा विभाग तथा अति. कार्यभार तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील(गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.उ.नि. अतुल नावले, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, रमेश शिंदे, समिर पाटील, पो.अंम. गजानन गरीबे, अभिजीत गढरी यांनी केली आहे.



-----oooo-----